दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | बुधवार दि.५ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१११ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## अंजली दमानियांच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करणार

**मुंबई**–सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात चांगलाच हल्लाबोल केला आहे. तसेच अंजली दमानिया यांनी दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा अनेक आरोप धनंजय मुंडे यांच्यावर लावले आहेत. आता यावर आपण अब्रू नुकसानीचा फौजदारी खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचा इशारा धनंजय मुंडे यांनी दिला आहे.मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करत म्हंटले, अंजली दमानिया यांनी आज दिवसभरात दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा खोटे व बेछूट आरोप केले आहेत. या विषयासह विविध विषयांवर मोघम आरोप करणाऱ्या अंजली दमानिया ताई यांच्या विरोधात आपण आता फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी आता ट्विट केले आहे.मागील ५८ दिवसांपासून कुठल्याही तपास प्रक्रियेवर काही प्रभाव पडू नये म्हणून शांत व संयमाने राहिलेले धनंजय मुंडे यांनी मात्र आता अंजली दमानी यांच्या खोट्या आरोपांवर मौन सोडले आहे. तर अंजली दमानिया यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला दाखल करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# धनजंय मुंडेनी जवळपास २७५ कोटींचा भ्रष्टाचार केला-अंजली दमानिया

## पुरावे दाखवत केला थेट आरोप !





**मुंबई । प्रतिनिधी**

डिबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे मिळणार होते. पण तत्तकालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी नॅनो युरिया आणि नॅनो डिएपीम खरेदीत २७५ कोटींचा घोटाळा केला. मुंडेंच्या काळात नॅनो युरियाची बॉटल २२० रुपयांना खरेदी करण्यात आली. गोगलगायी निर्मुलनाचं औषधही अव्वाच्या सव्वा दराने खरेदी केले. एकेका बॅटरी स्प्रेअरमध्ये त्यांनी पैसे लाटले. ५० कोटींचे डिलरशीपचे नियम बदलण्यात आले. कापूस साठवणुकीच्या बॅग खरेदीक ४२ कोटींचा घोटाळा केला. धनंजय मुंडेनी एका वर्षात अफाट पैसे खाल्ले,असा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुरव्यानिशी आज राज्याच्या कृषी खात्यातील भ्रष्टाचाराची पोलखोल केली. महायुती सरकारमध्ये तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलेल्या घोटाळ्यांची मालिकाच सुरू होती, असा आरोप करत दमानिया यांनी थेट कागदपत्रेच माध्यमांसमोर सादर केली. एकामागून एक घोटाळ्यांची मालिका वाचून दाखवत त्यांनी कृषी खात्यातील घोटाळे समोर आणले. तसेच आता तरी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणार की नाही, असा सवालही उपस्थित केला.

नॅनो युरिया, नॅनो डीएपी, बॅटरी स्प्रेअर, मेटाल्डे हाइड आणि कापूस गोळा करण्यासाठी लागणाऱ्या बॅगा खरेदीमध्ये गेल्या दोन-अडीच वर्षात कोटींचे घोटाळे झाल्याच आरोप अंजली दमानिया केला. त्यामुळे आतातरी भगवानगडाने त्यांचा पाठिंबा काढून घेतला पाहिजे आणि मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. अंजली दमानिया म्हणाल्या, कापूस गोळा करण्यासाठी लागणाऱ्या बॅगा खरेदीपासून नॅनो डीएपी,बॅटरी स्पेअर, मेटाल्डे हाइड पर्यंत भ्रष्टाचार झाला आहे. पण तो किती पट झालाय, हे पाहिलं तर धक्का बसणार आहे. या सर्वांचे दर एकदा पाहा, नॅनो युरिआ आणि नॅनो डिएपी या इफको कंपनीच्या आहे. नॅनो युरियाचा एक लीटरचा दर १८४ रुपये इतका आहे. म्हणजे ५०० मिलीलीटर बॉटलला ५०० रुपये मिळतात. पण धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक टेंडर काढण्यात आलं आणि ती बॉटल २२० रुपयात खरेदी करण्यात आली. बाजारात याची सिंगल बॉटल ९२ रूपयांना मिळते. पण धनंजय मुंडे यांनी १९ लाख ६८ हजार ४०८ बॉटल २२० रुपये दराने घेतल्या. म्हणजे दुपटीपेक्षा जास्त किमतीने या बॉटल्स खरेदी करण्यात आल्या.आता नॅनो डीएपीची एक लीटरच्या बॉटलची किंमत ५२२ रुपये इतकी आहे. म्हणजे अर्धा लीटरच्या बॉटलची किंमत २६९ रूपये इतकीच असेल.कृषी विभागाकडून १९ लाख ५७ हजार ४३८ बॉटल्स खरेदी करण्यात आल्या. बाजारभावानुसार अर्धा लीटर बॉटलची किंमत २६९ रूपये असताना कृषी विभागाकडून अर्धा लीटरची ही बॉटल ५९० रूपयांना खरेदी करण्यात आली. हे दोन्ही घोटाळे ८८ कोटींचे असल्याचा दावाही दमानिया यांनी केला.

बॅटरी स्पेअर टु इन वन वापरासाठी असून तो एमएआयडीच्या वेबसाईटवर उपलब्ध होतो. स्प्रेअरची किंमत २४५० रूपये इतकी आहे. एमएआयडीच्या वेबसाईटवर २९४६ रुपयांना हा स्प्रेअर विकला जात असताना कृषी मंत्र्यांनी टेंडर काढून ३४२६ रूपयांना बॅटरी विकत घेतली गेली. अशा पद्धतीने एक हजाराच्या वर एक एक बॅटरी स्पेअरमधून पैसे लाटले गेले. बॅटरी स्पेअरचे पाच लाखांहून अधिक लाभार्थी होते. बजेट फिक्स असल्याने लाभार्थी कमी करण्यात आले. असे २ लाख ३६ हजार ४२७ बॅटरी स्पेअर ३४२५ रुपयांना खरेदी करण्यात आले.

अंजली दमानिया यांनी कृषी मंत्री मुंडे यांच्या कापूस आणि सोयाबीनसाठी घेतलेल्या बोगस किमतीविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यानुसार, गोगलगायीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी घेतलेल्या मेटाल्डे हाइड या पीआयए कंपनीच्या पेटेंटेड उत्पादनाची खरी किंमत रिटेलमध्ये ८१७ रुपये आहे, परंतु मुंडे यांनी ती १२७५ रुपयांना विकत घेतली आहे. याशिवाय, त्यांनी १ लाख ९६ हजार ४४१ किलो मेटाल्डे हाइड खरेदी केली, तसेच ६ लाख १८ हजार कॉटन स्टोरेज बॅगा घेतल्या. अंजली दमानिया यांनी यावरून सूचित केलं की, या किमतीतील फरक आणि टेंडर प्रक्रियेतील घोटाळ्यामुळे सरकारला मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांनी हेही म्हटलं की, या अफाट पैशाचं गळत असताना या व्यक्तीला मंत्रीपदावर ठेवण्याची गरज आहे का? असे तीव्र सवालही उपस्थित केले.

# खाजगी संस्थेतील ट्रेनी शिक्षक अडकले ऑनलाईनच्या भोवऱ्यात

## पाच महिन्यापासून शाळेवर शिकवले, ना नोंद ना मानधन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध खाजगी संस्थेच्या शाळेत काम करत असलेले प्रत्येक शाळेवरील एक ट्रेनी शिक्षक हे ऑनलाईन च्या भोवऱ्यात अडकले आहेत.त्यांना प्रशासनाने तात्काळ न्याय मिळवून द्यावा ही मागणी केली जात आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय क्र संकीर्ण २०२४/प.क्र ९०/व्यशी-३,दि.९ जुलै २०२४ नुसार शिकाऊ प्रशिक्षणार्थी योजने अंतर्गत जि.प.शाळा व त्याचबरोबर खाजगी संस्थेतील शाळा याठिकाणी ट्रेनी शिक्षक रूजू करण्याचे आदेश देण्यात आले. परंतु यामध्ये फक्त जि.प.शाळावरील ट्रेनी शिक्षकांचे ऑनलाईन करुन त्यांचे मानधन देखील आले.खाजगी शाळेतील ट्रेनी शिक्षकांचा मानधन तर सोडा अद्यापही त्यांचे ऑनलाईन झाले नाही. यात नेमकी चूक कोणाची शिक्षक विभागाची की कौशल्य विकास विभाग की खाजगी संस्थेची याचे उत्तर मिळत नाही.

अध्यापन करणाऱ्या ट्रेनी शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना विचारपुस केली असता कोणत्याही प्रकारची माहिती आम्हाला आली नव्हती अथवा खासगी शाळेतील ट्रेनी शिक्षकांचं रूजू करण्याचे आदेश दिले नाही वगैरे अश्या प्रकारचे उत्तरे ट्रेनी शिक्षकांना दिली जातात. महत्त्वाचं म्हणजे केज तालुक्यातील सर्व संस्थेवरील शाळेतील ट्रेनी शिक्षक हे रुजू झाल्यापासून ते आत्तापर्यंत शाळेत स्व खर्चाने हजेरी लावतात. परंतु अद्यापही त्यांचे मानधन आले नसल्याने त्यांची मात्र धावपळ सुरू आहे. यामध्ये त्यांची एकच मागणी आहे कि आम्ही आत्तापर्यंत काम केले त्याचा मोबदला मिळणार का? मिळणार तर ते कधी? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.बेरोजगारांना संधी मिळाली आणि त्यातही त्यांची फसवनुक होत आहे आहे का हाच सवाल ट्रेनी शिक्षकांमधून उपस्थित होत आहे.

# खा.बजरंग सोनवणे करणार आज रेल्वे चाचणीची पाहणी

## नवगण राजुरी रेल्वे स्थानक येथे देणार भेट

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्ष रेल्वेची बीडकरांनी प्रतिक्षा केली. ही प्रतिक्षा आता संपत असून दि.४ रोजी विघनवाडी ते राजुरी आणि आज दि.५ रोजी विघनवाडी ते बीड रेल्वेची जलदगती चाचणी होत आहे. आज दि.५ रोजी सकाळी विघनवाडी ते नवगण राजुरी रेल्वे चाचणीची खा.बजरंग सोनवणे पाहणी करणार आहेत.



बीडला रेल्वे आलीच पाहिजे, अशा घोषणा मागील अनेक वर्षांपासून सुरू होत्या. यासाठी आंदोलने आणि मोर्चेही झाले. अहिल्यानगर ते बीड या २६१ कि.मी. अंतराच्या रेल्वेसाठी बीडवासियांचा गेल्या तीन दशकापासून संघर्ष सुरू आहे. पहिल्या टप्प्यात अहिल्यानगर ते नारायणडोह या ७ कि.मी.च्या अंतराचे काम पूर्ण झाले. पुढे टप्प्याने काम सुरू होते. अंमळनेर येथे रेल्वे येऊन थांबली होती. रेल्वेपुढे अडथळ्याची शर्यत होती. सदरील आडथळे पुर्ण करण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी लक्ष घातले आणि अडथळ्यांची शर्यत संपत आली. दि.४ फेब्रुवारी रोजी विघनवाडी ते राजुरी अशी रेल्वे चाचणी झाली तर आज ५ फेब्रुवारी रोजी राजुरी ते बीड या नवीन लोहमार्गावर हायस्पीड रेल्वेची चाचणी घेण्यात येत आहे. आज प्रत्यक्षात बीड शहरात रेल्वे जलदगतीने दाखल होणार असल्याने हा दिवस शहरवासियांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहीला जाणार आहे.आज खा.बजरंग सोनवणे हे विघनवाडी -नवगण राजुरी या मार्गात होत असलेल्या जलदगती रेल्वे चाचणीची पाहणी करणार आहेत. सकाळी ९.४५ वाजता ते नवगण राजुरी येथील रेल्वेस्थानक येथे भेट देतील, असे नियोजीत दौऱ्यात म्हटले आहे.

# अंबाजोगाईत अल्पवयीन मुलीचा विनयभंग; रोडरोमिओवर गुन्हा

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाई शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात एका रोडरोमिओवर गुन्हा दाखल करण्यात आहे.

अशोक काळे (रा. भिसे यांचे वाडा, प्रशांतनगर, अंबाजोगाई) असे त्या आरोपी तरुणाचे नाव आहे. याने १३ नोव्हेंबर २०२४ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत १४ वर्षीय अल्पवयीन पीडितेचा सतत पाठलाग केला आणि छेडछाड करून विनयभंग केला. तसेच, याबाबत घरी सांगितल्यास तिला आणि तिच्या कुटुंबियांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या असे पिडीतीने अंबाजोगाई शहर




पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी अशोक काळे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि जाधवर करत आहेत.

# शेतकरी ओळखपत्र काढा अन्यथा सर्व स्कीमा विसरा

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना आणि अनुदाने सुरू केली आहेत, परंतु आता या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांना 'शेतकरी ओळखपत्र' अनिवार्य करण्यात आले आहे. हे ओळखपत्र मिळवणे आता शेतकऱ्यांसाठी एक आवश्यक बाब बनली आहे. शेतकरी ओळखपत्र: काय आहे आणि का महत्त्वाचे ?

शेतकरी ओळखपत्र हे शेतकऱ्यांचे अधिकृत ओळखपत्र आहे ज्याद्वारे त्यांना सरकारी योजनांचा लाभ घेणे सोपे होते या ओळखपत्रामुळे शेतकऱ्यांना त्यांची ओळख पटवणे आणि शेतकरी म्हणून त्यांचे हक्क बजावणे सहज शक्य होते




ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया शेतकरी ओळखपत्र मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागते, या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना त्यांचे आवश्यक दस्तऐवज जसे की जमीनीचे ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक इ. सादर करावे लागते. ही प्रक्रिया घरबसल्या किंवा सीएससी (कॉमन सर्विस सेंटर) माध्यमातून केली जाऊ शकते फायदे आणि महत्त्व शेतकरी ओळखपत्रामुळे शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळतात. या ओळखपत्राद्वारे शेतकऱ्यांना सरकारी अनुदाने, कर्ज योजना, बीज आणि खत यांच्या खरेदीसाठी सब्सिडी, आणि इतर शेती संबंधित योजनांचा लाभ घेता येतो. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते अनिवार्यता आणि परिणाम आता शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केल्यामुळे शेतकऱ्यांना या ओळखपत्राशिवाय सरकारी योजनांचा लाभ मिळणार नाही. यामुळे शेतकऱ्यांनी या ओळखपत्राची नोंदणी करणे आवश्यक आहे. जे शेतकरी ही नोंदणी करणार नाहींत त्यांना सरकारी योजनांपासून वंचित राहावे लागेल नोंदणीची स्थिती तपासणे शेतकऱ्यांनी नोंदणी केल्यानंतर त्यांच्या अर्जाची स्थिती ऑनलाइन तपासता येते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या ओळखपत्राच्या प्रगतीची माहिती मिळत राहते शेतकरी ओळखपत्र ची नोंदणी करणे गरजेचे शेतकरी ओळखपत्र हे शेतकऱ्यांसाठी एक महत्वाचे दस्तऐवज बनले आहे. या ओळखपत्रामुळे शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ घेणे सोपे होते. म्हणूनच शेतक-यांनी या ओळखपत्राची नोंदणी करणे अनिवार्य आहे.

# देवेंद्र फडणवीस सरकारचा महत्त्वाचा निर्णय:सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी आता सर्वच शासकीय, निमशासकीय व महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य असणार आहे. तसेच या कार्यालयात मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावावा लागणार आहे. शासकीय कार्यालयातील संगणकावरील कळफलक सुद्धा मराठी भाषेतच असणार आहेत. इतकेच नव्हे तर मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर देखील शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषा धोरणामध्ये व्यवहारक्षेत्र निहाय शिफारसी अंतर्भूत आहेत. मराठी भाषेस येत्या २५ वर्षामध्ये ज्ञानभाषा व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे हे शासनाच्या सदर धोरणाचे अन्य उद्दिष्टांसह प्रमुख उद्दिष्ट आहे.केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर आता राज्य सरकारकडून देखील मराठी भाषेला अधिक सक्षमपणे व प्रभावीपणे रुजवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. तसेच आता या धोरणात शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, संगणक शिक्षण, विधी व न्याय व्यवहार, वित्त व उद्योजगत, प्रसारमाध्यमे, प्रशासनात मराठी भाषेचा वापर इत्यादी व्यवहारक्षेत्रनिहाय सविस्तर शिफारशी प्रस्तावित आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळफलकांवरील छापील अक्षर कळमुद्रा रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत असणे अनिवार्य आहे.सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वांनीच मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल.

## संपादकीय..

# मूलभूत बचत बँक खाते




नेहमीप्रमाणे आजही बरोबर ८च्या ठोक्याला दारावरची बेल वाजली. स्वयंपाक करणाऱ्या मावशी आल्याची वर्दी मिळाली. आज मावशींची स्वारी भलतीच खूश दिसत होती. हातातील पेढ्यांचा पुडा माझ्याकडे देत मुलीला दहावीच्या परीक्षेत ९३% मार्क मिळाल्याचे त्यांनी मला सांगितले. मावशींच्या कष्टांचे आणि त्यांच्या मुलीच्या मेहनतीचे चीज झाल्याचे समाधान वाटले. मावशी स्वयंपाक आटपून घरी जाताना मी त्यांच्या मुलीसाठी बक्षीस म्हणून पैसे पाकिटात घालून दिले. इतर कुठे खर्च न होता तिच्या शिक्षणासाठी त्याचा विनियोग व्हावा ह्या हेतूने, तिच्या नावे बँकेत खाते उघडून त्यात ते पैसे ठेवण्याचा सल्ला दिला. तेव्हा बँकेतील बचत खात्यात घातलेले सगळे पैसे काढता येत नाहीत. त्या खात्यात ठरावीक पैसे शिल्लक ठेवावेच लागतात, असे त्यांच्या मुलीचे म्हणणे त्यांनी मला सांगितले.

समाजातील अल्प उत्पन्न गटातील लोकांनाही किमान सामान्य अत्यावश्यक बँक सेवांचा लाभ घेता यावा यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने १७ ऑगस्ट २०१२ रोजी मूलभूत बचत बँक खात्याच्या घोषित केलेल्या योजनेबद्दल मी त्यांना माहिती दिली. याला शून्य शिल्लक बचत खाते असेही म्हणतात. मूलभूत बचत बँक ठेव खात्यात किमान शिल्लक आवश्यक नाही. खात्यात शिल्लक असले तर त्या रकमेवर ठरावीक दराने व्याज मात्र मिळते. परिणामी, शून्य शिल्लक बाबतीत कोणताही दंड आकारला जात नाही हेच या प्रकारचे खाते उघडताना ग्राहकांसाठी मुख्य आकर्षण ठरू शकते. या प्रकारचे खाते उघडण्यासाठी कोणत्याही प्रारंभिक ठेवीची आवश्यकता नसते. यासाठी वयाची वा किमान उत्पन्नाची अट नाही. कोणतीही निवासी व्यक्ती व हिंदू अविभक्त कुटुंबे मूलभूत बचत बँक खाते उघडण्यास पात्र असतात.

प्रत्येक प्रकारच्या बँक खात्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे विशिष्ट नियम व अटी लागू असतात. बचत खाते, चालू खाते, आवर्ती ठेव खाते, मुदत ठेव खाते, डिमॅट खाते किंवा एनआरआय खाते अशा विविध प्रकारची कितीही बँक खाती ग्राहक आपल्या गरजेनुसार कुठल्याही आणि कितीही बँकांमध्ये उघडू शकतात. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, ग्राहक मूलभूत बचत खाते मात्र एकापेक्षा जास्त उघडू शकत नाही. केवळ एकच मूलभूत बचत खाते ग्राहक, कोणत्याही एकाच बँकेत उघडू शकतो. मूलभूत बचत खात्यासाठी अर्ज करताना, तुमचे इतर कोणत्याही बँकेत मूलभूत बचत खाते नाही असे एक घोषणा पत्र तुम्हाला बँकेला द्यावे लागते. त्या बँकेत ग्राहकाचे इतर कुठल्याही प्रकारचे खाते नसणे अनिवार्य आहे. दुसरे कुठल्याही प्रकारचे खाते असल्यास, मूलभूत बचत खाते उघडलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, ते बंद करणे अनिवार्य आहे. असे केले नाही तर ती इतर खाती बंद करण्याचा अधिकार बँकेला असतो. ग्राहकांनी लेखी संमती दिल्यास ग्राहकांच्या विनंतीवरून सामान्य बचत बँक खात्याचे मूलभूत बचत खात्यामध्ये रूपांतरण केले जाऊ शकते. अशावेळी मूलभूत बचत खात्यामध्ये उपलब्ध असलेल्या सेवांची वैशिष्ट्ये आणि व्याप्ती बँकेने ग्राहकांना सूचित करणे आवश्यक असते. मूलभूत बचत खात्यांमध्ये तुम्ही दरमहा होणाऱ्या व्यवहारांवर मर्यादा असते. सहसा, बँका प्रत्येक महिन्यात फक्त चार वेळा पैसे काढण्याची परवानगी देतात. तुम्ही परवानगी दिलेल्या संख्येपेक्षा जास्त वेळा पैसे काढल्यास, बँक तुमचे शून्य शिल्लक खाते नियमित बचत खात्यात रूपांतरित करू शकते. ग्राहकांना पूर्वसूचना देऊन या अतिरिक्त व्यवहारांसाठी काही बँका नाममात्र शुल्क देखील आकारू शकतात. तसेच या खात्यात एका वर्षात एक लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा करता येत नाही किंवा खात्यात कधीही पन्नास हजार रुपयापेक्षा जास्त रक्कम शिल्लक ठेवता येत नाही. सदर खात्यातून एका महिन्यात रुपये १०००० पेक्षा जास्त रोख रक्कम काढता आणि इतर खात्यांत हस्तांतरण करता येत नाही.


मूलभूत बचत खात्यांमध्ये ठेवी आणि रोख रक्कम काढणे, विविध नेटबँकिंग सुविधांद्वारे पैसे पाठवणे आणि प्राप्त करणे किंवा बँक शाखांमध्ये चेक जमा करणे तसेच एटीएमच्या माध्यमातून पैसे मिळवणे ह्या मोफत सेवा समाविष्ट आहेत. मूलभूत बचत खाते उघडताना एटीएम डेबिट कार्डवर कोणतेही वार्षिक शुल्क आकारले जात नाही. एटीएम डेबिट कार्ड घेणे ऐच्छिक असते. एखाद्या ग्राहकाने एटीएम डेबिट कार्ड स्वीकारलेच पाहिजे अशी सक्ती बँक करू शकत नाही. मात्र, जर ग्राहकांनी एटीएम डेबिट कार्ड निवडले, तर बँकांनी अशा ग्राहकांना एटीएम डेबिट कार्ड, एटीएम पिन आणि त्याच्याशी संबंधित जोखीम याबद्दल शिक्षित करणे आवश्यक आहे. आपल्या इतर ग्राहकांना एटीएम डेबिट कार्ड आणि पिनच्या वितरणासाठी अवलंब करत असलेल्या प्रक्रियेचाच अवलंब करून सुरक्षित वितरण वाहिन्यांद्वारे मूलभूत बचत खातेधारकांना ही सुविधा प्रदान करणे अनिवार्य आहे. ग्राहक या खात्याचे बँक स्टेटमेंट तपासू शकतो. संगणक किंवा फोनवरून वीज, फोन आणि पाणी बिलही भरू शकतो. मूलभूत बचत खात्यासंबंधी सविस्तर माहिती देऊन जवळच्या बँकेत मुलीच्या व मावशींच्या नावे मूलभूत बचत खाते उघडण्याविषयी मावशींना मी सुचवले. त्यामुळे मुलीच्या पुढील शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशांची तरतूद करता येईल. मूलभूत बचत खात्याची उपयुक्तता व महत्त्व आमच्या मावशीपर्यंत पोहोचले. आपल्या आजूबाजूच्या आपल्याला मदत करणाऱ्या बऱ्याच व्यक्ती अनेक महत्त्वाच्या उपयुक्त माहितीविषयी अनभिज्ञ असतात. त्यांना सुजाण, सजग, सक्षम ग्राहक बनवण्याचा प्रयत्न करू या. किंबहुना आपण नवीन वर्षाचा हा आपला संकल्प बनवू शकतो.

# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट

ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यांसह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिमालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ 'अल निनो' परिस्थिती आहे, तर 'ला निना' परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, 'अल निनो'चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते.

जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामान चक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि



दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली. अल्मोडा येथील 'सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटर'चे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहे. ओम पर्वतावरही हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे.जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. २०२२ च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला 'ग्लोबल वार्मिंग'चा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे २००० पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी ५८ अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. 'द इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंट'च्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. २०२३-२४ च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषत: पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. २०२३ च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी मॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ. अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापमान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे.ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. गेल्या ३० ते ४० वर्षांच्या मूल्यांकनावरून असे दिसून येते, की बर्फवृष्टीचे प्रमाण कमी होत आहे आणि पावसाचे प्रमाण वाढत आहे. कमी बर्फ आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत. गढवाल विद्यापीठाचे प्राध्यापक आणि हिमनदी शास्त्रज्ञ एचसी नैनवाल यांनी सांगितले, की हवामानातील बदल आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे हिमवर्षाव कमी होत आहे. हिमनद्यांमध्ये बर्फ साचू शकत नाही, हे भविष्यातील जलसंकटाचे लक्षण आहे. हिमालयीन प्रदेश हिमवर्षाव नसलेले दिसतात. नैनवाल म्हणतात की, हिमवर्षाव नसणे ही चिंतेची बाब आहे; परंतु त्याहून धक्कादायक बाब म्हणजे हिमनदीतील रात्रीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ वेगाने वितळत आहे. ग्लेशियरमध्ये बर्फ गोठत नसेल तर हिमनदीचे वस्तुमान संतुलन ऋणात्मक होते. रात्रीच्या वेळी हिमनदीचे तापमान हवे तितके थंड नसते. नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत हिमनदीमध्ये सर्वाधिक बर्फ पडतो. मे ते ऑक्टोबर या काळात बर्फ वितळतो. जेव्हा पृथ्वी तापमानवाढीच्या अवस्थेत असते, तेव्हा हिमनद्या मागे सरकतात. म्हणजे त्यांची घनता आणि जाडी कमी होते.

# विद्यार्थ्यांनी करा अभ्यासाचा संकल्प!

सन २०२५ या नवीन वर्षाचा आज चौथा दिवस आहे. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण जीवनात यशवंत होण्यासाठी नवीन संकल्प करीत असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा महत्त्वाची असते. त्या आनुषंगाने अभ्यास सुद्धा महत्त्वाचा असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत असताना आपल्या परीक्षा डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाचा संकल्प केला पाहिजे. यातच त्यांचे परीक्षेतील यश अवलंबून असते. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण आपला संकल्प करीत असतात. त्यासाठी तो मागील वर्षाच्या चुका सुधारून पुन्हा तशा चुका होणार नाहीत याची काळजी घेत नवीन संकल्प सुरू करीत असतात. जीवनात यशस्वी होण्यासाठी नवा संकल्प करावा लागतो. त्यासाठी आपले उद्दिष्ट ठरवून डोळ्यांसमोर ठेवावे लागते. प्रत्येकाचे उद्दिष्ट वेगवेगळे असले तरी विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हे असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास केला पाहिजे. एक दिवस किंवा परीक्षेच्या आदल्या रात्री रात्रभर अभ्यास केला म्हणजे आपल्याला चांगले गुण मिळतील असे नाही. शेवटी आत्मविश्वासाने व प्रसन्न वातावरणामध्ये तीन तास पेपर अचूक सोडवावा लागणार आहे. याची तयारी झाली का? याचे उत्तर विद्यार्थ्यांनी आता शोधत बसण्यापेक्षा जे विद्यार्थी बोर्डाची परीक्षा देणार आहेत त्यांनी नवीन वर्षाचे स्वागत करीत वेळ वाया न घालविता अभ्यासाचा संकल्प करावा. यातच त्यांचे भवितव्य आहे.



मागील वर्षाला गुड बाय म्हणत असताना अभ्यासक्रम सुद्धा शिकवून पूर्ण झाला असेल. तेव्हा नवीन वर्षाला वेलकम म्हणत वेळ घालविण्यापेक्षा आतापर्यंतची अभ्यासातली प्रगती लक्षात घेऊन वार्षिक परीक्षेत जास्तीत जास्त गुण कसे मिळतील त्याचा संकल्प करावा. आता हीच वेळ आहे, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे.त्यासाठी आतापासून परीक्षा होईपर्यंत आपले आरोग्य सांभाळून वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. म्हणजे वेळेचे नियोजन जरी केले तरी दिवसातील किती तास अभ्यास करणार आहोत त्याचा संकल्प विद्यार्थ्यांना करावा लागेल. यातच त्यांचे यश अवलंबून आहे. त्यासाठी आपली परीक्षेसाठी तयारी किती झाली याचे उत्तर त्यांनी स्वत:ला प्रामाणिकपणे द्यावे. हीच यशाची पायरी आहे. नवीन वर्षाची सुरुवात करीत असताना विद्यार्थ्यांनी इतर संकल्प बाजूला सारून आपल्या भवितव्यासाठी आपले विषय व त्या विषयाच्या अभ्यासक्रमाचा विचार करून अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी परीक्षा होईपर्यंत मित्र, नातेवाईक व सखा मित्र बनलेला मोबाईल यांना दूर ठेवून अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे लिखाणाची सुद्धा नियमित सवय ठेवावी. परीक्षा संपल्यावर पाहुणचार करावा मात्र आता परीक्षा होईपर्यंत पाहुणचाराचा विचार करू नये. काही विद्यार्थी शैक्षणिक वर्ष सुरू झाले की आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हा संकल्प डोळ्यांसमोर ठेवून नियमित अभ्यास करीत असतात. त्यामुळे ते परीक्षेला हसत हसत सामोरे जावून विशेष श्रेणीत पास होतात. आलीकडे तर १०० टक्के गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण होऊ लागले आहेत. तसेच शाळांचा सुद्धा १०० टक्के निकाल लागतो. यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून संकल्प केला जातो. तसेच हे यश संकल्पामुळेच शक्य होते. तेव्हा जीवनात यश संपादन करायचे असेल तर मनापासून संकल्प हा अतिशय महत्त्वाचा असतो. जीवनात संकल्पाशिवाय यश संपादन करू शकत नाही. त्यासाठी जिद्द अतिशय महत्त्वाची असते. आता विद्यार्थ्यांनी मागील वर्षातील चुका उजळत बसण्यापेक्षा त्या बाजूला सारून अंतिम परीक्षेची तयारी कशी करता येईल त्या दृष्टिकोनातून संकल्प करावा. तेव्हा विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेतील आपली प्रगती लक्षात घेऊन अभ्यासाला लागावे. ते सुद्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे सोने करण्यासाठी अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी वेळेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. प्रत्येक दिवसाचे नियोजन करून त्याप्रकारे विषयांचे वेळापत्रक तयार करावे लागेल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. तेव्हा प्रत्येक विषयाची परीक्षा कधी आणि मध्ये सुट्टी किती दिवस आहे याचा अंदाज घेऊन अभ्यासाला लागावे.महत्त्वाची बाब म्हणजे आता वेळ कमी आहे. अभ्यास अभ्यासक्रमानुसार करावा. त्यानंतर आपली किती तयारी झाली याचा सुद्धा विद्यार्थ्यांनीच विचार केला पाहिजे. आता अवांतर वाचनाकडे जास्त लक्ष देऊ नये याची खबरदारी विद्यार्थ्यांनी घ्यावी. तसेच घरातील टीव्हीपासून चार हात दूर राहावे. पालकांनी सुद्धा मुलांचे भवितव्य ओळखून आपल्या मुलांच्या अभ्यासामध्ये व्यत्यय येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. मुलांच्या परीक्षा होईपर्यंत विशेष कार्यक्रमांपासून दूर राहावे. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या जेवणामध्ये बदल करू नये. परीक्षा कालावधीत त्याला जे आवडते तेच जेवण द्यावे. शक्यतो बाहेरील पदार्थ खाणे टाळावे. तेव्हा नवीन वर्षाचा आज ४ था दिवस आहे. आता विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून जीवनात चांगले यश संपादन करण्यासाठी आजपासून परीक्षा संपेपर्यंत आपल्या मनातील ताण तणावावर मात करत अभ्यासाचा संकल्प करायला हवा. हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे.

## चांदापुर येथे अकराव्या बौद्धधम्म परिषदेचा शानदार समारोप

# भारत ही बुद्धभूमी ; बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज 'विपश्यना' साठी ही भुमी योग्य-पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान

### शासन स्तरावर या जेतवन भुमीस निधी प्राप्त करुन देवुन रस्ते काम पुर्ण करुन देणार-मा.आ.संजय दौंड






**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी अकराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेला अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या धम्म परिषदेचे उद्घाटक म्हणून पुज्य भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलम्वांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान (माजी कुलगुरू, कोरियन बुध्दीस्ट विद्यापीठ, दक्षिण कोरिया), पुज्य भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव अहमदपुर), पुज्य भिक्खू धम्मशील थेरो ( शिवणी, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) भंते मैत्रेय (छ संभाजी नगर) भन्ते मैत्रेय संबोधी( बार्शी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. या धम्म परिषदेचे 'सम्यक संकल्प' या पेजवरून फेसबुक लाईव्ह थेट प्रक्षेपण करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. मागील काही वर्षांपासून बौद्ध धम्म उपासकांसाठी नांवारूपास आलेले सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे अकराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली.


या धम्म परीषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ऍड.अनंतराव जगतकर हे होते. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय दौंड, माजी लेफ्टनंट कर्नल डॉ.एम.एच.कांबळे तर यावेळी नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, कृषी तज्ज्ञ डॉ.मधुकर खळगे, समाजभूषण आनंद वाघमारे, बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे, मिलिंद नरबागे, श्रावण बनसोडे, महादेव बनसोडे, संग्राम गित्ते (सरपंच, चांदापुर), प्रशांत गित्ते (ग्रा.पं.सदस्य,चांदापूर.), उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, गोल्ड मेडल प्राप्त वंदना राहुल सुरवसे, बौद्धाचार्य सचिन रणखांबे तसेच प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी धम्म देसना देताना पुज्य भिक्खू माजी कुलगुरू डॉ.लि.ची.रान म्हणाले की, चांदापूर हा परिसर नैसर्गिक आहे. मेडिटेशन करण्यासाठी उत्तम ठिकाण आहे. येथील ध्यान केंद्राचा सर्वांना फायदा होईल. संबोधी, निर्वाण प्राप्त करण्यासाठी अशीच जागा लागते. भारत ही बुद्धभूमी आहे. सम्राट अशोक यांनी भारतासह जगात बुध्द धम्म रूजविला. तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन केले. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज आहे. भारतात जीवंत बुध्दीझम पहावयास मिळतो असे गौरवोद्गार पुज्य भिक्खू डॉ.रान यांनी काढले. तर पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांनी आपण शुध्द झाले पाहिजे, भिक्खू तयार करणे, ज्ञानी माणसं तयार करणे हा या धम्म परिषदेचा मुख्य उद्देश आहे. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले संविधान वाचविण्यासाठी आपण सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे पुज्य भदन्त डॉ.महाथेरो म्हणाले. तर पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांनी धम्म मनाची मशागत करतो, त्यामुळे धम्म पुढील पिढीला देण्यासाठी अशा धम्म परिषदा आवश्यक आहेत असे पुज्य भिक्खू पय्यावर्धन म्हणाले. तर यावेळी पुज्य भदन्त महाविरो म्हणाले की, बुध्द धम्म हा सदाचार शिकवतो, त्यामुळे सुखाच्या प्राप्तीसाठी धम्माची वाट चालावी लागेल, धम्माचा अंतिम उद्देश समजून घ्या, आधुनिक समाजात सदाचार व दुराचार यांचे युद्ध सुरू आहे. मानवाने चिंतन व मनन करावे, चिवर आणि भिक्षापात्र ही धनसंपत्ती सर्वश्रेष्ठ आहे. असे सांगून पुज्य भदन्त महाविरो यांनी कुशल कर्म, त्रिशरण, पंचशील, अष्टांग मार्ग, दहा पारमिता, कर्मवाद, धम्म संस्कार, दानाचे महत्व विषद केले. यावेळी पुज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी धम्म परिषदस उपस्थित उपासक, उपासिका यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आमदार दौंड यांनी मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. प्रारंभी डॉ.राजेश इंगोले, डॉ.मधुकर कांबळे, प्रा.डॉ.मधुकर खळगे यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप ऍड.अनंतराव जगतकर यांनी केला. प्रास्ताविक राजेंद्र घोडके यांनी केले. तर सुत्रसंचालन जगन सरवदे, सचिन रणखांबे यांनी करून उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. धम्म परिषदेच्या ठिकाणी परळी ग्रामीण पोलीस यांचे सुरक्षा पथक उपलब्ध करून देण्यात आले होते. या धम्म परिषदेत महत्वपुर्ण ठराव मांडण्यात येवून ते पारित करण्यात आले. हे ठराव केंद्र व राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे यावेळी जाहिर करण्यात आले. ठरावांचे वाचन प्रा.गौतम गायकवाड यांनी केले. धम्म उपासक हे पांढरे वस्त्र परिधान करून धम्म परिषदेत सहभागी झाले होते. धम्म परीषदेच्या पार्श्वभूमीवर रमाई चौक, कबीरनगर, अंबाजोगाई, जवळगाव, पुस, घाटनांदूर, उजनी, पट्टीवडगाव, नागापूर मांडवा (प), डाबी, या गावांतून धम्म रॅली काढण्यात आली, धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे तसेच चंद्रकांत बनसोडे, शाहीर गौतम सरवदे, सुरेश कांबळे, किशोर इंगळे, आकाश वेडे, सुशिल इंगळे, नागेश जोंधळे, राहुल सुरवसे, बी.एस.बनसोडे आदींनी पुढाकार घेतला होता.

## ऑल इंडिया पोस्टल क्रिकेट स्पर्धेसाठी तांत्रिक प्रतिनिधी म्हणून अमरसिंग ढाका यांची निवड

### अमरसिंह ढाका यांच्या निवडीने बीडच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा

**बीड । प्रतिनिधी**

येत्या पाच फेब्रुवारी पासून ११ फेब्रुवारी पर्यंत वडोदरा येथे ३५ वी अखिल भारतीय डाक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होत आहे या स्पर्धेत १६ राज्यांचे संघ सहभागी होणार आहे. आणि ही स्पर्धा व्यवस्थित पार पाडावी म्हणून केंद्रीय निरीक्षक आणि तांत्रिक प्रतिनिधी म्हणून भारतातून तीन लोकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच्यामध्ये महाराष्ट्राचे दोन प्रतिनिधी नियुक्त करण्यात आलेले आहे.



त्यापैकी बीड जिल्ह्याचे वरिष्ठ क्रिकेट खेळाडू व महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे क्वालिफाईड पॅनल अंपायर व बीड एसटी स्टँड पोस्ट ऑफिस चे पोस्ट मास्तर अमरसिंह ढाका यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे या नियुक्तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अमरसिंग ढाका हे महाराष्ट्र पोस्टल क्रिकेट संघाचे तीन ते चार वेळेस कर्णधार पद भुषविले आहे. व ते १९९७ पासून २०२४ पर्यंत महाराष्ट्र पोस्टल क्रिकेट संघाचे खेळाडू आहेत व रेस्ट ऑफ महाराष्ट्रातून जोगळेकर ट्रॉफी, जसदनवाला ट्रॉफी खेळले आहेत, आदर्श क्रिकेट क्लब चे ते सदस्य आहेत आणि आदर्श क्रिकेट क्लब साठी खूप टूर्नामेंट जिंकून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. नवीन तरुण होतकरू खेळाडूंना नेहमीच मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या अमरसिंग ढाका यांचे अभिनंदन होत आहे.

## श्री समर्थ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांकडून 'माहेर' संस्थेत प्रेरणादायी समाजसेवा

**पारनेर । प्रतिनिधी**

श्री समर्थ अकॅडेमी संचालित श्री समर्थ पॉलिटेक्निक, म्हसणे फाटा येथील संगणक विभाग आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थ्यांनी शिरूर येथील 'माहेर' संस्थेत पुस्तकदान आणि विविध मदत वस्तूंचे वाटप केले. 'माहेर' संस्था ही अनाथ मुलांसाठी काम करणारी एक सामाजिक संस्था आहे, जी दुर्लक्षित, अनाथ आणि वंचित मुलांना आश्रय, शिक्षण, आरोग्यसेवा आणि आत्मसन्मानाने जगण्यासाठी योग्य वातावरण पुरवते. या संस्थेचा मुख्य उद्देश समाजातील अशा दुर्बल घटकांना आत्मनिर्भर बनवणे आहे.विद्यार्थ्यांनी या उपक्रमात संस्थेतील मुलांसाठी शैक्षणिक सामग्री, दैनिक उपयोगाच्या वस्तू तसेच लहान मुलांसाठी एक अल्पोपाहाराचे आयोजन केले. या सामाजिक कार्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि आपल्या कृतीतून समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण केली. विद्यार्थ्यांनी संस्थेतील मुलांशी संवाद साधला आणि त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या संवादामुळे मुलांना आधार आणि सहानुभूती मिळाली.विद्यार्थ्यांनी सांगितले की, या भेटीतून त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती आपले कर्तव्य समजले. विद्यार्थ्यांना समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. श्री समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डी. डी. देसले यांचे विशेष मार्गदर्शन आणि पाठिंबा लाभला. तसेच, संस्थेचे संचालक कैलास गाडीलकर यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरित केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एस. एस. दरोडे आणि प्रा. एम. व्ही. जाधव यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मिळून आयोजित केलेला हा उपक्रम एक सामाजिक बांधिलकीच्या कार्यात रूपांतरित झाला.

## वेळूवन बुद्ध विहारामध्ये एकदिवसीय अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर व सुभेदार रामजी आंबेडकर यांचा स्मृतीदिन कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने एक दिवसीय अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर व सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर यांचा स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.केज शहरातील भीमनगर येथील वेळूवन बुद्ध विहारामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडून स्थापित या मातृसंस्थेकडून समाजोपयोगी विविध उपक्रम राबविण्यात येतात. धम्म प्रसारासोबतच विज्ञाननिष्ठ समाज घडविण्यासाठी संस्थेकडून प्रयत्न होत असतात.



भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष आयु.डॉ.प्रभाकर ठोके यांच्या अध्यक्षतेखाली व आयु.जयपाल मस्के, चंद्रकांत मस्के, महेंद्र मस्के यांच्या नियोजनाने हे शिबीर व अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.सर्वप्रथम शिबिराची सुरुवात आदर्शांना वंदन व सुभेदार रामजी आंबेडकर यांना अभिवादन करून झाली.यानंतर सामूहिकपणे त्रिसरण व पंचशील घेण्यात आले.भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा पूर्वचे जिल्हाध्यक्ष आयु.बी.बी.धन्वे यांनी शिबिराचे उद्घाटन केले व प्रमुख मार्गदर्शिका आयुनी.स्वातीताई गायकवाड यांचा परिचय दिला.यावेळी आयुनी.सुनिता कांबळे यांची कन्या कु.पुजा कांबळे हिची सरकारी रुग्णालयात किटकशास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल तिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दोन सत्रामध्ये शिबीर संपन्न झाले.पहिल्या सत्रामध्ये श्रद्धा-अंधश्रद्धा यातील फरक,अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या तसेच अंधश्रद्धा व भोंदुगिरीचे प्रकार सांगुन महिलांना यात कसे फसवले जाते व त्यांचे शोषण कसे होते याबाबत माहिती सांगितली.दुसऱ्या सत्रात ज्योतिष शास्त्र आहे का? या विषयावर आयु.बी.बी.धन्वे यांनी विविध दाखले,पुरावे देवून सखोल मार्गदर्शन केले यानंतर आयुनी.गायकवाड यांनी चमत्कारामागचे विज्ञान समजावून सांगण्यासाठी विविध प्रयोग-प्रात्यक्षिके सादर केली.ज्यामध्ये पाण्याचा दिवा पेटवणे,वातीविना दिवा पेटवणे,नारळ फोडल्यानंतर आत वेगवेगळ्या वस्तु निघणे,लिंबु कापल्यानंतर त्यातही वस्तु निघणे,मंत्राने अग्नी पेटवणे व इतर प्रयोग सादर केले.शेवटी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगुन नागरिकांनी सजग राहिलं पाहिजे व बुवा-बाबांच्या भुलथापांना बळी पडु नये असे सांगण्यात आले.शिबीरासाठी आयु.अरुण पटेकर,शिवकुमार मस्के आयुनी.विशाखा ठोके,कौशल्या मस्के, महानंदा गायकवाड,कुसुम मस्के,सुनिता कांबळे,लता वाघमारे,नानी मस्के व इतर बौद्ध उपासक-उपासिका,बालक-बालिका यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस आयु.जयपाल राहूल मस्के यांनी केले.शेवटी सरणत्त घेवून शिबीराची सांगता करण्यात आली.

## रामकृष्ण परमहंस स्मृती सोहळा ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी कालावधीत संपन्न होणार

### ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या ओजस्वी वाणीतुन विठु माझा लेकुरवाळा कथा.

**केज । प्रतिनिधी**

केज शहराचे सांस्कृतिक व अध्यात्मिक वैभव असणारा तसेच प.पु.स्व. वासुदेवराव खंदारे गुरुजी व रामकृष्ण परमहंस परिवाराच्या गुरुमाता सुमनबाई खंदारे यांच्या आशिर्वादाने गेल्या १७ वर्षापासुन चालत असलेला रामकृष्ण परमहंस स्मृती सोहळा दि.९ फेब्रुवारी ते दि.१६ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न होणार असुन या कार्यक्रमामध्ये विठु माझा लेकुरवाळा ही कथा भावरत्न गुरुदास विवीध कथाकार ह.भ.प. समाधान शर्मा यांच्या ओजस्वी वाणीतुन साकारणार आहे.ठाकुर रामकृष्ण परमहंस स्मृती सोहळ्याचे मुख्यआकर्षण हे दि.९ फेब्रुवारी रोजी शोभायात्रा मुख्य रस्त्या वरून निघणार असुन या शोभायात्रेत विवीध शाळांचे विद्यार्थी आपली कला साकारतात तसेच वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी तसेच वाद्यवृंद आपली कला सादर करतात.देशाच्या काना कोपऱ्यातुन भाविक भक्त या सोहळ्यासाठी आठ दिवस वेळ काढुन आवर्जून उपस्थित राहुन सोहळ्याचा आनंद घेतात.

यावर्षी सोहळ्याचे हे १८ वे वर्ष असुन दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी वकिलवाडी हनुमान मंदीर येथुन शोभायात्रा निघणार असुन केज




शहरातील मुख्य रस्त्या वरून ही शोभायात्रा विठाई मंगल कार्यालय, पंढरीनगरी धारुर रोड, केज या ठिकाणी पोंहचणार आहेत. त्यानंतर दररोज सकाळी १० ते १०-३० यावेळेत ठाकुर रामकृष्णवचनामृत या ग्रंथाचे पारायण होणार आहे.त्या नंतर सकाळी ११ ते १ या कालावधीत भावरत्न गुरुदास ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या ओजस्वी वाणीतुन विठु माझा लेकुरवाळा ही कथा होणार आहे.सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ होणारअसुन रात्री ७-३० ते ९-३० या वेळेत हरीकिर्तन होणार आहेत.या किर्तनसेवेसाठी दि.९ फेब्रुवारी रोजी रविवारी ह.भ.प.पांडुरंग महाराज शितोळे आळंदी देवाची दि.१० फेब्रुवारी रोजी सोमवार रोजी ह.भ.प.जयेश महाराज भाग्यवंत मुंबई,दि.११ फेब्रुवारी रोजी मंगळवार रोजी ह.भ.प.उमेश महाराज दशरथे आळंदी देवाची,दि.१२ फेब्रुवारी बुधवार रोजी ह.भ.प. संजय महाराज धोंडगे नाशिक,दि.१३ फेब्रुवारी रोजी गुरुवार रोजी ह.भ.प.रामराव महाराज ढोक नागपुर,दि.१४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळकेकर जळगाव,दि.१५ फेब्रुवारी रोजी शनीवार रोजी ह.भ.प.१००८ महामंडलेश्वर मनिषानंदजी शास्त्री महाराज यांचे हरीकिर्तन होणार असुन दि.१६ फेब्रुवारी रविवार रोजी ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे काल्याचे किर्तन होऊन नंतर महा प्रसाद होणार आहे.तरी या सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घेऊन सेवेची संधी द्यावी अशी विनंती रामकृष्ण परमहंस प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात येत आहे.

# हत्या प्रकरणातील पुरावे जर नष्ट झाले तर त्याला प्रशासन जबाबदार-धनंजय देशमुख

## वडिलांच्या न्यायासाठी प्रसंगी मरण सुद्धा पत्कारायची तयारी -वैभवी देशमुख

## तर सोशल मीडियातून धमक्या येत असल्याचा धनंजय देशमुख यांचा दावा

**केज । गौतम बचुटे**

माझ्या वडिलांच्या हत्यारांना जो पर्यंत कठोर शिक्षा होत नाही आणि न्याय मिळत नाही; तो पर्यंत आम्ही मागे हटणार नाही. प्रसंगी वडिलांच्या न्यायासाठी मरण सुद्धा पत्करायला लागले ! तरी त्याची सुद्धा तयारी आहे. असे अत्यंत भाऊक उदगार संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख हिने प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. तसेच हत्या प्रकरणातील पुरावे नष्ट झाल्यास त्याला तपास यंत्रणा आणि प्रशासन जबादार असेल. असे धनंजय देशमुख म्हणाले. तर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांचा आम्हाला विश्वास आहे. असा विश्वास देखील व्यक्त केला.या बाबतची माहिती अशी की, संतोष देशमुख हत्या प्रकरणी भगवान गडाचे महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी केलेल्या वक्तव्या नंतर मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख, मुलगी वैभवी देशमुख, मुलगा विराज व गावकऱ्यांनी भगवान गडावर जावून महंत नामदेव महाराज शास्त्री यांची भेट घेतली व मारेकरी आणि त्यांना मदत करणाऱ्यांची माहिती व पुरावे दिले. तसेच देशमुख कुटुंबीय हे संत भगवान बाबा यांचे भक्त होते आणि यात कोणताही जातीवादाचा मुद्दा नाही. हे सांगितले.

त्या नंतर दि. ३ फेब्रुवारी रोजी वैभवी देशमुख हिने आपले वडील संतोष देशमुख यांच्या हत्ये संदर्भात आणि तपासा संदर्भात माध्यमांशी बोलताना म्हणाली की, यातील सर्व आरोपींना कठोर शिक्षा व्हायला हवी आणि त्यांना फासावर लटकावायला हवे. यासाठी त्यांचे कुटुंब हे शेवट पर्यंत ही न्यायाची लढाई लढत राहणार आहेत. प्रसंगी यासाठी मरण जरी पत्करावे लागले; तरी वडिलांच्या न्यायासाठी त्याची सुद्धा तयारी असल्याचे भावनिक उदगार काढले.

**पुरावे नष्ट झाले तर त्याला तपास यंत्रणा आणि प्रशासन जबाबदार :-**संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचा तत्कालीन तालुका अध्यक्ष विष्णू चाटे याचा गुन्ह्यातील मोबाईल अद्यापही सापडत नाही. म्हणून त्याच्यावर पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. परंतु फक्त पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करून भागणार नाही; तर सर्व पुरावे हस्तगत करावे लागतील आणि जर पुरावे नष्ट झाले.



तर तपास यंत्रणा आणि प्रशासन याला जबाबदार असेल. असे संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख म्हणाले. तसेच राष्ट्रवादी पक्षाच्या अजित पवार गटाच्या केज येथील संपर्क कार्यालयात संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींचा राबता होता. हे त्यांना पाठीशी घालणाऱ्याना कसे समजत नाही ? असे मंत्री धनंजय मुंडे यांचे थेट नाव न घेता धनंजय देशमुख म्हणाले.

**सोशल मीडियावरून धमक्या :-** सोशल मीडियातील पोस्ट मधून त्यांना गंभीर स्वरूपाच्या धमक्या येत आहेत. या बाबत धनंजय देशमुख हे त्याची माहिती तपास यंत्रणेला देणार आहेत. तसेच संतोष देशमुख यांच्या हत्ये संदर्भातील आणखीही काही पुरावे हाती येणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

**आमची मानसिकता काय असेल ? :-** धनंजय देशमुख यांनी भगवान गडावर जावून महंत नामदेव महाराज शास्त्री यांना सर्व पुरावे आणि फोटो दिल्या नंतर तसेच आवादा कंपनीच्या सुरक्षा रक्षकाला झालेली मारहाण आणि संतोष देशमुख यांची हत्या यामुळे देशमुख कुटुंब आणि गावकरी यांची मानसिकता काय असेल ? परंतु त्यांची कायदा आणि न्याय व्यवस्था याच्यावर विश्वास असल्यानेच त्यांनी सर्व माहिती पोलीस ठाण्यात देवून कारवाईची मागणी केली होती. असे वैभवी देशमुख आणि धनंजय देशमुख यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे विश्वास :-** धनंजय देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार व एकनाथ शिंदे या दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यावर विश्वास व्यक्त केला मात्र गुन्हेगारांना मदत करणाऱ्या काहींच्या हे कसे लक्षात येत नाही ? असा प्रश्न देखील उपस्थित केला .

# सोयाबीन खरेदीसाठी शेतकरी वेटिंगवर

## खरेदीसाठी शिल्लक फक्त तीन दिवस



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई तालुक्यात सहा खरेदी केंद्रावर आतापर्यंत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी पन्नास टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी झाली असून शासनाकडून सोयाबीन खरेदी करण्यासाठी तीनच दिवस शिल्लक राहिले आहेत. येणाऱ्या तीन दिवसात नोंदणी केलेल्या पन्नास टक्के शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी कशी होणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मराठवाड्यातील बहुतांशी जिल्ह्यात नगदी पीक म्हणून शेतकरी नगदी पीक म्हणून सोयाबीन पिकाला प्राधान्य देतात. यावर्षीही शेतकऱ्यांनी सोयाबीनचा अधिक पेरा केला होता. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनला साडेतीन ते चार हजार पर्यंत सोयाबीनची खरेदी करण्यात आली. जीवाचे रान करून पिकवलेल्या सोयाबीनला कवडी मोल भावाने शेतकऱ्यांना विक्री करावी लागली. शासनाने शेतकऱ्यांचे सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला अंबाजोगाई तालुक्यात सहा खरेदी केंद्रामार्फत शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदी साठी नोंदणी करण्यात आली. शासनाकडून आपले सोयाबीन खरेदी होईल या आशेने शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. पन्नास टक्के नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी आज रोजी पर्यंत आली आहे. शासनाकडून सोयाबीन खरेदीचे अंतिम मुदती ३१ जानेवारी दिली होती. त्यानंतर सहा फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ५० ते ५५ टक्के शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी झाली आहे. येणाऱ्या तीन दिवसात ही आकडेवारी साठ टक्के पर्यंत जाऊ शकते. राहिलेल्या चाळीस टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीसाठी मुदत वाढ मिळणार का असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात उपस्थित झाला आहे. सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केलेले शेतकरी वंचित राहणार नाहीत यासाठी शासनाकडून मुदतवाढ मिळते का याकडे सर्व शेतकऱ्यांच्या लक्ष लागले आहे.

# मुलांतील सुप्त कलागुणांना वाव द्या-श्री मधुकरजी सावंत

**नेकनूर । प्रतिनिधी**

पालकांनी आपल्या पाल्यामध्ये कोणते सुप्त गुण दडलेले आहेत याचा शोध घेऊन, त्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांचे करियर घडवावे असे विचार से. नि. अपर पोलीस अधीक्षक श्री. मधुकरजी सावंत साहेब (सीआयडी,पुणे) यांनी व्यक्त केले.येथील कै. आण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था, चांदेगाव, संचलित न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल नेकनूर या शाळेचा ११ वा वार्षिक स्नेसंमेलन सोहळा आणि यशस्वी विद्यार्थ्यांच्या कौतुक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कै अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था चांदेगाव चे अध्यक्ष मा श्री रमेशजी पोकळे होते. यार्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची संकल्पना वृक्षसंवर्धन आणि भारतीय लोकनृत्य ही होती.पुढे बोलताना त्यांनी, परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि काबाडकष्टाशिवाय जीवनात यशस्वी होता येत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि कोणत्याही प्रकारचे काम करण्याची लाज बाळगू नये असे आवाहनही यावेळी सावंत यांनी केले.




यावेळी अध्यक्षीय समारोप करताना रमेश पोकळे यांनी न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधून, तसेच अभ्यास करून, कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊन आपल्या पालकांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे म्हणत शाळेच्या वतीने आगामी काळात उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मा. श्री.मधुकर सावंत साहेबांचे पोलीस सेवेतील गुणवत्ता पूर्ण योगदान त्यांची कर्तव्यावरील निष्ठा यासाठी त्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले होते. म्हणून त्यांचा न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले मौलाना सय्यद साबेर अली यांनी मोबाईल हा मुलांसाठी शाप आहे, मोबाईल मुळे विद्यार्थी बिघडत चालले आहेत, गरज असेल तरच मुलांच्या हातात मोबाईल द्या असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. उपशिक्षणाधिकारी श्री काकडे सर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रकारच्या सुविधा आणि भावी काळात होणाऱ्या बदलांची माहिती दिली.तसेच शिक्षण विस्तार अधिकारी श्री तोडकर साहेब ,युवा उद्योजक सय्यद कौसरभाई, युवा उद्योजक तेजस शिंदे, बन्सीधर हावळे सर, ज्येष्ठ व शिक्षणविस्तार अधिकारी श्री रसाळ सर वारकरी संप्रदायाचे जिल्हा अध्यक्ष मा श्री ह. भ. प. हरिदास जोगदंड , यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते. रसाळ सरांनी विद्यार्थी ,शिक्षकासह शाळेने घेतलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमाबाबत कौतुक केले. तसेच सरपंच अनिताताई लांडगे,उपसरपंच श्री सचिन शिंदे यांची देखील कार्यक्रमास उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या सौ स्वाती पोकळे यांनी केले. तर शेवटी संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक विद्यार्थी पालक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार मानले. या पत्रकार खालेद भाई, तुळशीराम शिंदे,अशोक शिंदे,शहाजी भोसले, राजकुमार चोबे , खारके सर हे उपस्थित होते. विद्यार्थी, पालक, शिक्षक, ग्रामस्थ, शेतकरी, आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रेम प्रकरणातून चौघांनी केला विवाहित तरुणाचा खून

## प्रेयसीच्या नातेवाईकांनी जेवायला बोलावून खून करून प्रेत महामार्गावर फेकून दिले

**केज । गौतम बचुटे**

बीड जिल्ह्यातील एका विवाहित तरुणाला प्रेम प्रकरणातून पाहुण्याच्या घरी जेवनाच्या बहाण्याने बोलावून घेवून त्याचा खून करून प्रेत महामार्गावर फेकून दिल्याची खळबळजनक घटना धाराशिव जिल्ह्यात घडली असून खून झालेला तरुण हा बीड जिल्ह्यातील साळेगाव येथील आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव येथील एक तरुण मुस्तकिन जब्बार शेख हा धाराशिव जिल्ह्यातील मोहा ता. कळंब येथे एका मस्जिदमध्ये धार्मिक शिक्षण देण्याचे काम करीत आहे. मुस्तकिन शेख याचे लग्न झालेले असून त्याला एक मुलगा व मुलगी आहे; परंतु त्याची पत्नी व त्याचे आपसात पटत नसल्याने ते दोघे विभक्त राहत होते. दरम्यान मुस्तकिन शेख याचे पुणे येथे मूळची बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथील असलेल्या एका विवाहित महिले सोबत ओळख झाली आणि त्या दोघांचे प्रेमसंबंध जुळले. मात्र त्यांचे हे सबंध त्या महिलेचे वडील आणि भाऊ यांना हे प्रेम सबंध मान्य नव्हते. या बाबत दोघांच्याही घरच्यांनी त्यांना समजावून सांगितले; मात्र त्यांनी त्यांचे ऐकले नाही. दरम्यान मुस्तकिन शेख याने त्याच्या आई-वडिलांना ते दोघे लग्न करणार असल्याचे सांगितले होते. यामुळे त्या महिलेच्या वडिल सरदार शेख व भाऊ अकबर शेख यांनी मुस्तकिन शेख याला जिवे मारण्याची धमकी सुद्धा दिली असल्याचे त्याने त्याच्या वडिलांना सांगितले होते. दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८:३० वा. चे सुमारास मुस्तकीन शेख याने त्याच्या आईला सांगीतले की, तो मौजे गोजवाडा येथे सरदार शेख व अकबर शेख यांनी त्याचे बहीणीचे घरी मेजवाणी आयोजीत केली आहे. मी दोन तासामध्ये परत येतो असे सांगुन फोन ठेवला. त्या नंतर त्या महिलेचा वडील सरदार शेख, भाऊ अकबर शेख, दुसरा भाऊ व त्याचा मेव्हणा या चौघांनी दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री १२:००



वाजता मुस्तकिन शेख याचा खून करून त्याचे प्रेत हे धाराशिव जिल्ह्यातील वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या महामार्गावर फेकून अपघात घडल्याचा बनाव केला. मयत मुस्तकिन शेख यांच्या खून प्रकरणी त्याचे वडील जब्बार शेख यांच्या तक्रारी वरून दि. ३ फेब्रुवारी रोजी वाशी जि. धाराशिव पोलीस ठाण्यात सरदार शेख, त्याचा मुलगा अकबर शेख व दुसरा मुलगा आणि त्यांचा मेव्हणा यांच्या विरुद्ध गु. र. नं. ३९/२०२५ भा. न्या. सं. १०३(१) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रमेश घुले हे तपास करीत आहेत.

**मुस्तकिन शेख यांचा खून कसा घडला :-**

दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १०:०० वा चे सुमारास मुस्तकीम यांने त्याचे वडील जब्बार शेख यांना फोन वरून सांगीतले की, त्याचे प्रेम असलेल्या महिलेचा भाऊ अकबर शेख व त्याचा मित्र असे त्याला भेटण्यासाठी मोहा ता. कळंब येथे येणार आहेत. त्या नंतर त्याच दिवशी दुपारी ४:०० वा. मुस्तकीन शेख हा त्याचे सोबत अकबर शेख व अकबरचा यांचा मित्र हे दोघे साळेगांव येथे आले आणि उद्या त्या महिलेचे वडील व भाऊ हे त्यांना सोयरिकिसाठी भेटायला येतो असे म्हणून निघून गेले. दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता सरदार शेख, त्या महीलेचा भाऊ व तिच्या बहीणाचा नवरा असे साळेगांव येथे आले. त्यावेळी त्यांनी मुस्तकिन शेख यांच्या आईला सांगितले की, तुमच्या पोराला समजून सांगा अन्यथा काय होईल ते सांगता येत नाही ! असे म्हणून धमकी देवून गेले. दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८:३० वा. चे सुमारास मुस्तकीन शेख याने त्याच्या आईला सांगीतले की, तो मौजे गोजवाडा येथे सरदार शेख व अकबर शेख यांनी त्याचे बहीणीचे घरी मेजवाणी आयोजीत केली आहे. मी दोन तासामध्ये परत येतो असे सांगुन फोन ठेवला. दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री १२:०० वाजता मुस्तकिन शेख याचे प्रेत हे धाराशिव जिल्ह्यातील वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या महामार्गावर आढळून आल्याची माहिती त्याच्या आई वडिलांना मिळाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077